मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
जिल्हा वाचनालय

# मराठीचें स्वराज्यारोहण

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २१४४



REFBK-0018186

किंमत १ रुपया

दिवाळी-भेट १९६९
ठाणे, मराठी ग्रंथ संग्रहालय
या संस्थेस
खाकाशाका कडून

# मराठीचे स्वराज्यारोहण

२१४४
७६६५८
३०।३।७

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

लेखक :
दासभक्त,
बी. ए., एलएल. बी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वजमा
अनुक्रम ........................ दि: ....................

★

REFBK-0018186

[ किंमत १ रुपया ]

प्रकाशकः–श्री. काकासाहेब निगुडकर
११६, घोडबंदर रोड,
खार–मुंबई–५२.

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक :
श्री. भा. पोतकर,
प्रदीप प्रिंटींग प्रेस,
सेनापती बापट मार्ग,
मुंबई–२८.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ५६६५५ दि: ८/९/८१
वर्गीक २९७ स्थ क्र. ३०१३१६९
१८९८६

प्रस्तावना

# — मराठीचें सत्यसंशोधन —

या पुस्तकांत मराठीचें स्वराज्यारोहण, मराठीचें स्वर्गावरोहण व असलाकडे ( Towards Self Realisation ) असे तीन निबंध आहेत. "स्वातंत्र्या" करतां सर्वस्व-त्यागी मराठी जिण्या-वाङमयाचं दर्शन आहे त्यांत. संतवाङ्मय हा मराठीचा पाया आहे. वेदांचं वर्म म्हणजे सत्य, अस्सल, सहज, एकतत्व. तें अस्सल एकतत्व सूक्ष्म, स्वाधार, स्वानंदघन, स्वतंत्र आहे. मराठी वाङ्मयांत तें बद्ध करून आपल्या जिण्यांत सिद्ध करून दाखवलं आहे मराठी संतांनी. निराकाराला साकार केलं शद्वसृष्टींत. संतांच्या या शद्वसृष्टींत ( अक्षर-वाङ्मयांत ) श्रवणानें वा वाचनानें संचार करणारा कोणीही मानव संतांच्या योग्यतेस चढल्याशिवाय राहणार नाहीं 'येथें मोक्ष च असे आइता । श्रवणाच माजी' ॥ अशी ज्ञानोबाराय ग्वाही देत आहेत आपल्या वाङ्मयाची. चैतन्याचा जिव्हाळा, पराबुद्धीचा उगम श्रीगणेश, जड-चेतनाचा संगम-संधि ॐकार संतवाङ्मयांत सांपडतो. श्रीगणेश-अथर्वशीर्षांत उपनिषद श्रीगणेशांस म्हणंत 'त्वं वाङ्मयः त्वं चिन्मयः' 'तूं वाङ्मय आहेस, तूं चैतन्यमय आहेस.' साऱ्या संत वाङ्मयांतील शद्वांत अर्थ व मंत्र- सामर्थ्य आहे. एकतत्वाचा पराकोटीचा महिमा प्रकाशित करणारं नाम शतकोटीवेळा आलं आहे संतवाङ्मयांत. नामस्मरणच जणूं! म्हणूनच संतवाङ्मयाचं मराठी माध्यम मानवांस सत्यशोधनाचं ( Physics–Metaphysics च्या पलिकडील प्रांताचं संशोधन ) फुकटचं, सोपं नाम–साधनही आहे. समर्थ-तुकोबांच्या वाङ्मयानें क्रांती व उत्क्रांति साधली आहे शिवकालीन जिण्यांत.

जिण्यावाङ्मयाची अशी एकी दुसरीकडे सांपडत नाहीं. स्वातंत्र्यप्रेमानें प्रेरित होऊन अंतर्बाह्यत्याग करून " स्वराज्य " सिद्ध करणारी ही गट्टी कोणत्याही आगामी मानव कुलास आदर्श ठरणारी आहे. इमान ( सत्यनिष्ठा ) सेवा व मानवता हीं जिण्या-वाङ्मयांत अखंड जागवून जिण्याचा परमअर्थ कळणं स्वार्थत्यागांत आहे हे सिद्ध केलं, समर्थ-तुकोबानीं व शिवराजा-प्रजेनें ! अगदीं सामान्य माणसांनीं सुद्धां असामान्य त्याग केला शिव-स्वराज्यकाळीं.

ज्ञानेश्वरांनीं आपल्या ज्येष्ठ बंधूशीं ' सख्य ' करून आपल्या कनिष्ठ बंधूभगिनीला पाठींशीं धरून ज्ञानेश्वरीसारखा योगावरील अधिकारी ग्रंथ आपल्या १५ व्या वर्षीं लिहिला. त्यांनीं वयाच्या २२ व्या वर्षीं जिण्याला पूर्णविराम ठोकून जिवंत समाधि आनंदानें पत्करली. एकनाथ प्रपंचांच होते. नामदेव-तुकोबातर प्रपंचात पोळून निघाले. समर्थांनीं आपल्या " श्रेष्ठ " बंधूच्या प्रपंचाशी, आपल्या आईशीं आपुल्कीनें वागून श्रेष्ठांच्या मुलाला आपली गादी चालवण्यास अनुज्ञा दिली. संतवाङ्मय-जिणं निवृत्तीप्रधान असून पौरुषपर पण आहे हेंच यावरून सिद्ध होतें. समर्थ-तुकोबांचं ओंवी-अभंग वाङ्मय जसं क्रांतिकारक तसं उत्क्रांतिकारकही आहे. संत वाङ्मयाला मराठी माणसानें केव्हांही विचकतां कामा नये. संतांच्या संयमी स्वभावांत विश्वशक्तींवर सत्ता चालवणार पौरुष आहे. 'आधी' केलं नी मग सांगीतलं ' असं पौरुष त्या वाङ्मयांत आहे. या त्यागपर वाङ्मयांत जें स्वयंपूर्त प्रेम सांपडतं त्या प्रेमांत अत्यंत पतित वृत्तीचा राक्षसीवृत्तीचा, जडवृत्तीचा, चैतन्यमय, दिव्य-प्रेममय कायापालट करण्याचं सामर्थ्य आहे. नवयुगीन समजरचना कोणत्याही नमुन्याची झाली तरी तिला, इमान सेवा व मानवता हीं मानवी मूल्यें मानवणारच. " अस्सल " मानवाचा इमान, सेवा, व मानवता संभाळणं हा स्वभाव

आहे 'अस्सल' मानवाची-एकतत्वाची-पुरुषाची-पुरुषोत्तमाची ओळख कोणत्याही आगामी समाज रचनेंत ( New Socialorder मध्यें ) करुनघेण्यास सदर स्वभाव व्यक्त ला उपयुक्त ठरणार आहे.

चालू अणु-आकाश युगांत-सुद्धां नव-वैज्ञानिक ( Scientists ) विश्वाच्या मूळ तत्वाचा शोध लावूं पाहात आहेत. मानवाचें मूळ, ( Life Force चं मूळ, जीव-शक्तीचं मूळ ) अद्याप त्यांच्या होऱ्यांत आलेलं नाहीं. मुख्यतः अणु-आकाश शास्त्रानें ( Atom ( & Space Science ) सापेक्षता ( Theory of Relativity ) Quantum प्रमेय H तत्वाचा Beharriour व त्याचा 'मुक्तसंचार' यांनीं विश्वाच्या जडत्वाला, स्थूलत्वाला चांगलाच धक्का दिला आहे. जडसृष्टीच्या त्यांच्या संशोधन क्षेत्रांत आश्चर्यकारक भूकंप होत आहेत जणूं! नववैज्ञानिकांच्या ( Seientists च्या ) लवकरच लक्षांत येईल कीं केवळ जड, स्थूल यंत्रतंत्रांनीं ( Mechanical, Mathematical, Physicalor Technical methods नीं ) सत्य-संशोधनाचं कार्य अपुरंच राहणार. (Meta-Physics च्या ) मन, बुद्धीच्या पलीकडील प्रांत, वेदांचं ( एक तत्वाचं ) वर्म आपल्या संशोधक जिण्यांत आणल्याशिवाय सत्य--तत्वाचं आकलन होणें नाहीं. हें ज्याचं त्यानेंच जाणावयाचं आहे. वेदांतील 'नेति नेति' ( clịmination ) करून फार तर negative अप्रत्यक्षप्रमाणं ते उभीं करूं शकतील त्यांच्या सत्य-संशोधनांत. संताचं सांगणें म्हणजे सर्वांतरयामीं अशा एका परम–सूक्ष्म ( Infinite ) तत्वांतून सूक्ष्म व जड–सृष्टीची ( भासमान् ) उत्पत्ति झालेली आहे. जगांत अखंड चैतन्यमय जीवन आहे, मृत्यूला जडत्वाला जागाच नाहीं. संतांचं सांगणं मुळींच वेद–बाह्य नाहीं. नवयुगीन अजब शोधांचं वा त्यांच्या आश्वासित सुख–समृद्धीचं संतांनां मुळींच वावडं नाहीं. साधकांनासुद्धां

नवसंशोधनाला विचकण्याचं कांहींच कारण नाहीं. कारण नव-वैज्ञानिक संत-सिद्ध-सत्याकडेच हळूंहळूं प्रगति करीत आहेत. जो मानव अणु–आकाशांत यंत्र–सामुग्रीनें उलट–सुलट गति उत्पन्न करूं शकतो तो मानव स्वतः मुळांत कोण आहे त्याचा अणु–आकाशाशीं काय संबंध आहे याचा शोध अद्याप नववैज्ञानिकांच्या होऱ्यांत येत नाहीं. संतांनीं तो शोध लावून ते विदेही होऊन बसले. 'अणोरणीयां तोकडा, तुका आकाशाएवढा' हें तुकोबांचं काव्य नसून तो त्यांचा व संत, सिद्ध, योगी, ऋषि, मुनि यांचा अनुभव आहे. अणुगर्भीत वा आकाशांत तोच 'पुरुष', 'अस्सल मानव' आपल्या शक्तीचे खेळ पाहात आहे. जीव हा अजर–अ र आहे पण त्यांच्या "अस्सल" ( नकली नव्हे ) शिवस्वरूपांत तो अजर–अमर आहे, एकीएक आहे, हें सत्य ज्यावेळीं त्यांच्या Seientists च्या ( नववैज्ञानिकांच्या ) संशोधनांत येईल त्यावेळीं त्यांचा दृष्टीपालटच ( from Without to the Within ) होईल व त्यांची तरल दृष्टि 'संत' होईल. विश्वांतील अनंत कोटि पदार्थ त्यांच्या होऱ्यांत येत आहेत व त्यांचं गणित ते करूं शकतात. ते पदार्थ समर्याद आहेत. पण एकीएक "एक तत्व" जे आहे तें अ-गणितच राहणार. ते निसर्गाच्या काय-द्यांत बसत नाहीं. तें तत्व ज्याला सांपडलं तो ( Scientist असो वा साधक असो ) एकीएकच झाला. मग गणित कुणी कशाचं करायचं ? वस्तू आपणाचि होणें । ऐसें वस्तूचें पाहणें ।। समर्थ. आपल्या सूर्य मालेंतील ग्रहताऱ्यावर जा वा त्या पलिकडील सूर्य मालेंत प्रवेश मिळवा एक तत्वाचं संशोधन अपुरंच राहणार आहे.

प्रस्तुत लेखकाचे एक स्नेही, 'अस्सलाकडे' या कथानकाचे कर्ते खांदर, यांच्या सदर कथानकांतील कांहीं वेंचक व प्रस्तुत निबंधांशीं संबंधित उतारे या पुस्तकांत दिले आहेत. सदर कथानकांतील व्यक्ति,

विभूति शाळा–कॉलेजांतील मुलगे ( Teenagers ) स्थळं, प्रसंग इत्यादि बहुश: वास्तव घटनांतील आहेत. गांव, व्यक्ति, विभूति व सदर मुलगे इत्यादींचीं नांवं कांहीं नकली व कांहीं आद्याक्षरांत दिली आहेत अशीं मुलं–माणसं घटना वगैरे त्या काळीं भारतांत विशेषत: ( महाराष्ट्र, विदर्भ इ. ) 'मराठींत' गांवोगांवीं होती. मग नांवांत काय महत्व राहिलं ? सामान्य माणसांनीं असामान्य त्याग केलेलीं ही माणसं ! फक्त सदर कथानकांतील वेड्याचं इस्पीतळ व चोरांचा तुरुंग हीं गांवच्या पूर्व–पश्चिम टोकांस कायमची बसलेली विचित्र स्थळं "त्या काळीं" गांवोगांव नव्हती.

लोकमान्यांची प्रतियोगीसहकारिता व महात्माजींची अहिंसक असहकारता ह्या दोन तंत्रांचा साहेबाशी झुंज देण्यांत ज्या दोन महायुद्धात उपयोग केला गेला त्या दोन महायुद्धांचा संधिकाल कथानकाचा. विसावं शतक, विसावं साल व विशीचं वय ( Teenagers ) अशी शाळा-कॉलेज मधली शिव-स्वराज्य-स्फूर्त मंडळी ही. नवविज्ञान युगांतील साऱ्या जाणीवा असलेली व आदर्श आचार्यांच्या शिक्षेंत तयार झालेली, अवसानघात विसरलेली ही नवजवान मंडळी गांवांत लोकसेवेनें, त्यागानें, एकनिष्ठेनें, स्वदेशाशी इमान राखून गावांत लोककार्य करीत होतीं. अशीच मंडळी महाराष्ट्र, विदर्भ वगैरे मराठी प्रदेशांत गांवोगांव होती. स्वातंत्र्यप्रेमाखातर सर्वत्याग केला या सर्वांनीं.

विलायती वस्तू, शाळा-कॉलेज, कोर्ट, साहेबाची नोकरी इत्यादि वर बहिष्कार ( Boycott ला ) बहर आला होता तेव्हां. सधन-निर्धन, विद्यार्थी-वकील, डॉक्टर, वगैरे सुशिक्षित वर्गापासून तो कारकून शेतकरी, कामकरी शिपाई वर्गानेंही यथाशक्ति या बहिष्कारांत भाग घेतला होता. कित्येक मुलांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा झाला. कित्येक अभ्यासू

बुद्धिमान, मुलाचें (Career) विद्यार्जन खलास झालें. मुलां-माणसांच्या शिक्षण व रोजगार त्यागानें कित्येक कुटुंबांची हलाखीची स्थिति झाली. तरीपण सारे बाल, तरुण, प्रौढ स्त्रीपुरुष शिव-स्फूर्त त्यागाच्या विशुद्ध भावनेनें भारलेले असल्यानें, तेंव्हां वा पुढें कधीं ही कोणाचा अवसानघात झाला नाहीं. लोकमान्य सेवकांच्या व महात्म्यांच्या वाङ्मय शक्तीनें, व्याख्यानं, प्रवचनं, लेख इ. झंझावाती वाङ्मयप्रचारानें व नाना तऱ्हेच्या संघटनामुळें शिवकालीन अंतर्बाह्य त्यागी जिण्याचा पुन्हां जीर्णोद्धार होत होता जणूं मराठी जिण्या-वाङ्मयांत ! जिण्यावाङ्मयाचा ( प्रपंच परमार्थाचा ) हा योग म्हणजे स्वराज्यसिद्धी कारक योग ! खां. द. र. यांच्या अस्सलाकडे पुस्तकांतील मुलं-माणसं या बहिष्कारी व सत्याग्रही युद्धांत १९२० सालापासून आघाडीवरील त्यागी वीर होते. प्रत्येक मराठी मुलानें ( teenager ) नें शिवबासारखं विशीच्या वयाला स्वार्थत्यागानें स्वराज्याचं तोरण बांधलं जणूं !

प्रस्तुत पुस्तकांतील प्रथम निबंध शिवबांच्या राजयोगी विभूति-मत्तेवर आहे. इमान (तत्वनिष्ठा, सत्यनिष्ठा, स्वामीनिष्ठा) पहिलें तें हरिकथा-निरुपण ( एक तत्वाचा शोध व बोध ) सेव. (स्वामी-सेवा, लोक-सेवा, देश-सेवा ) दुसरें तें राजकारण. तिसरी मानवता [ fellow-feeling विश्व बंधुत्व, भूतदया ( हेंच भांडवल संतां ) ] हीच शिवकालीन त्रैमूर्ति 'अस्सलाकडे' या खांदरच्या कथानकांतील सत्यसृष्टींतल्या व्यक्ती-विभूतींनी जागविली लोकमान्य-महात्माच्या साहेबांशीं झालेल्या सामन्यांत. दुसऱ्या निबंधांत शिवकालीन अखेर जिण्यापासून तो अद्यावत अशा मराठी जिण्या-वाङ्मय-मानसाचं दर्शन आहे. ज्या कालखंडाचा ( शिव निर्वाणापासून तो १८१८) शेवट सर्वतोपरी (अंतर्बाह्य) 'स्वराज्य' गमावण्यांत व दीडशें

वर्षांची पारतंत्र्याची ' जन्मठेप ' मिळण्यांत झाला तो कालखंड केवळ दुर्दैवी नसून सारे अतिवासनांचा गुलाम झाल्यामुळें दुबळा झालेला होता. परस्पर द्वेषामुळें, सत्तालोभामुळें, फंदफितुरीनें, आत्मघातक भाऊबंदकीला कारण झाला तो कालखंड. मराठी जिण्याची अशी दुर्दशा झाली तरी मराठी वाङ्मयांतील पौरुष, मराठी सत्य-संशोधनाची परंपरा, मराठी संतांनीं पंत-पंडितांनी, कांहीं कवि-शाहिरानीं कायम राखली. लोकमान्य-महात्म्यांच्या काळीं व तदनंतर मराठी वाङ्मयाची सर्वांगीण वाढ होत आहे. शब्दसमृद्धि व भाषासमृद्धि बरोबर विचारसमृद्धिपण झालेली आहे. निराकाराला साकार करूं शकणाऱ्या मराठी वाङ्मयशक्तिला नवसंशोधन आत्मसात करण्यास कांहींच कठीण नाहीं.

तिसरा निबंध ' अस्सलाकडे ' हा खांदर यांच्या वर सांगितलेल्या ' अस्सलाकडे ' या कथानकांतील महामौनी संत रामारुती महाराज व सदानंद महाराज ( एका काळचे दहशतवादी Terrorist ) यांचा व प्रस्तुत लेखकांस चांगले ठाऊक असलेल्या महाराष्ट्राबाहेरील दोन मराठी ( रंग अवधूत महाराज नारेश्वर व रामबाई ) व महाराष्ट्रेतर पण मराठी जिण्याशीं महाराष्ट्रांत समरस झालेल्या दोन मुंबईजवळील वज्रेश्वरी-गणेशपुरी गांवदेवी येथील भगवान् नित्यानंद व स्वामी मुक्तानंद परमहंस यांचा आहे. या " सत्य " सृष्टींतल्या व भारतीय योगशास्त्राप्रमाणें सत्याचं संपूर्ण संशोधन केलेल्या लोकसेवक विभूति होत. वाङ्मय जिण्याची, प्रपंच-परमार्थाची समाधि साधणारी ही मंडळी. यांतील विभूति आजन्म प्रपंच-त्यागी असल्या तरी लाखों प्रापंचिकांना त्यानीं प्रपंचांतील पौरुषाचं मार्ग-दर्शन करून त्यांना " मार्गी " केलं. मराठीची फलश्रुति म्हणजे पौरुष संशोधन-साधन-सिद्धी. संतांनीं पौरुष आपल्या जिण्यांत खेळवलं.

नवयुगांतील संशोधनानें जी सुख-समृद्धि व नव-समाज-रचना होण्याचा संभव वाटत आहे. त्यांत प्रत्येक व्यक्तीला सारीं सुखं मिळाली तरी विश्वांतील एकतत्वाचा शोध अपुराच राहील. तो शोध ज्याचा त्यानेंच लावावयाचा आहे. त्या शोधाला मानवाची मानव देहाची जरूर आहे असं संतांचं सांगणं आहे. एकतत्वाचा शोध म्हणजे एकतत्व होणं. वस्तू आपणची होणें। ऐसे वस्तूचें पाहणें ॥ ॥ समर्थ ॥ (To be is to know) एकाकार झाल्यावर सांगण्याला दुसरा उरत नाहीं. नेति नेति अशा negative भाषेत सांगता येईल. स्वर्गातील देवलोकांच्या-जे त्रिकालज्ञानी, शक्तिमान असे खरे-पण शांति वांट्याला येत नाहीं. नरदेहांत येण्याची ते इच्छा करत त. तुकोबांचा अभंग-स्वर्गीचे अमर इच्छिताती देवा। मृत्युलोकीं व्हावा जन्म आम्हां ॥ सारी सुखं असली तरी मानव-व्यक्तीला जोपर्यंत एकतत्वाचा साक्षात्कार नाहीं तोपर्यंत Utopia मधेंसुद्धां तो देवांसारखा अशांत राहणार. ' एकतत्व जिज्ञासा एकदा झाली कीं मानव तहानभूक मारून तें आत्मसात करणार, हेंच सत्य-संशोधन.

वेदाचं वर्म म्हणजे एकतत्व. संतांच्या जिण्या-वाङ्मयाचं वर्म म्हणजे प्रेम. जनता-जनार्दनावरचं प्रेम. ' भूतदया हेचि भांडवल संतां ' मराठी जिण्या वाङ्मयाचं वर्म म्हणजे त्याग. प्रस्तुत पुस्तकांतील "अस्सलांकडे" या निबंधांतील भगवान् नित्यानंद म्हणत "महाराष्ट्र त्यागभूमि! महाराष्ट्र त्यागभूमि! गुजराथ भोगभूमि! गुजराथ भोगभूमि!" मराठीच्या वांट्याला "त्याग" आला? नाहीं. शिव-कालीं स्वातंत्र्याकरतां त्याग केला साऱ्यांनीं. "अस्सल" जिण्याचं जणूं साधन केलं साऱ्यांनीं. लोकमान्य-महात्म्यांच्या काळीं पण त्याग केला साऱ्यांनीं, शिवकाल म्हणजे पौरुषाचा काळ, काळावर मात करणारी सारी स्त्री-पुरुष-मंडळी, कर्मवीर वीरमाता, वीरपत्नी,

सुवर्णयुगाचा कालखंड तो ! शिवकालीं व्यक्तींना, विभूतींना, स्थळांना, प्रसंगांना सुवर्णमूल्यं, टिकाऊ मूल्यं केव्हांही न बदलणारीं ( Sterling Values ) मूल्यं होतीं. आगामी शांतियुगांतील वा क्रांति युगांतील कोणत्याही समाज रचनेला योग्य अशीं मूल्यं म्हणजेच इमान सेवा, मानवता. या त्यागाच्या मागें प्रेम ही परम आनंददायक टिकाऊ वस्तू आहे. मातृ-प्रेम, पतिव्रता-प्रेम, मित्र-प्रेम, नाम-प्रेम, संत-प्रेम, सद्गुरु-प्रेम, स्वामी-प्रेम, जनता-जनार्दन प्रेम वगैरे "अस्सल" मानव भारतीय संस्था आहेत. या प्रेमाची एक झलक मानवाचं आख्खं जिणं उजळून टाकण्यास समर्थ आहे. पराकोटीच्या प्रेमाचा महिमा संतांच्या तोंडूनच ऐका. संत कबीरांना कुणी म्हटलं 'कबीरसाहेब तुमच्या प्रेमासारखं "अस्सल" प्रेम दुनियेंत सांपडणार नाहीं. कबीर उत्तरतात, 'कबीर, कबीर, क्या कहे जा जमुना के तीर । एक गोपी के प्रेममें बहगये कोटि कबीर ॥' जा, यमुना तीरावर जा आणि पहा. एकेका गोपीच्या प्रेम-प्रवाहांत कोटी कोटी कोटी कबीर वाहून चालले आहेत. अशा, या अस्सल प्रेमाखतर "वस्तू"ला प्रतिभा–प्रसूति होऊन प्रसाददायक नवनवोन्मेषशाली जिवंत काव्यांचं, अनेक सूर्यमालांचं सर्जन झाले. या साऱ्या उत्पत्तीचं ज्यांना मूळ निराकार प्रेमांत प्रेममय "वस्तूंत" सहजांत, अस्सलांत, एकतत्वांत विसर्जन करतां येतं ते संत, सद्गुरु. प्रेममय, आनंदमय, चैतन्यमय, करुणामय असा हा पुरुष ( पुरुषोत्तम ) पौरुषानें, प्रेमानें स्वार्थ-त्यागानें मिळतो हें संतांचं सत्य–संशोधन.

---

( निबंध १ ला )

# मराठीचें स्वराज्यारोहण

'शिवाजी म्हणजे डोंगरांतला उंदीर. शिवाजी म्हणजे-अक्षर शत्रू, शिवाजी म्हणजे भाषण–संभाषण ठाउक नसलेला मुखदुर्बळ, शिवाजी म्हणजे लुटारू,' वगैरे इतिहास लेखकाच्या शालेय शिक्षणाच्यावेळीं असे. साहेबाच्या राज्यांतला हा प्रकार. आमचं प्रौढ मुलांचं (Teen-Agers) विशीचं वय, विसावं साल व विसावं शतक असा नवविज्ञान युगाच्या सुरवातीचा तो काळ होता. लोकमान्यांची प्रतियोगी सहकारता व महात्म्याची अहिंसक असहकरता या दोन "स्वदेशी" महायुद्धांचा संधिकाळ तो ! पहिल्या जागतिक महायुद्धानंतरच्या लगतचा काळ तो ! "साहेबाच्या राज्यांत अशा पुष्कळ गोष्टी मराठीचं विडंबन करणाऱ्या होत्या. शिवछत्रपतींच्या मावळसेनेंतल्या शूर शिपायांसारखे पोषाख कचेरींतल्या पट्टेवाल्यांना देऊन साहेबानें शेंदाड–शिपाई तयार केले होते." (अस्सलाकडे-ले.खांदर.)

आमच्या शालेय शिक्षणाचेवेळीं आमचे एक आदर्श आचार्य××× यांनी शिवराजाच्या रणधुरंधर, राजकारण कुशल व राजयोगी विभूतीमत्त्वेबरोबरच शिवराजाच्या व त्याच्या प्रजेच्या इमान, सेवा व मानवता या त्रिगुणांचं महत्त्व आपल्या कथाकुशल वाणीनें आमचे प्रौढ मनावर चांगलंच बिंबवून ठेवलं होतं. "त्यावेळेला शिक्षक म्हणजे सोंवळा मानव. निर्व्यसनी, साधा, भाविक असा बहुधा तो असायचा, बरेच विद्वान देशभक्त सरकारी नोकरी न करतां शाळा चालवीत, शिक्षक बनत. निरपेक्ष व निःस्वार्थीपणें मुलांना शिक्षण देत ('अस्सलाकडे ले. खांदर) आमचे सदर आदर्श आचार्य ××× प्रामाणिक,

स्वातंत्र्यप्रेमी देशभक्त होते. " बंडखोर " शिवाजीपासून स्वातंत्र्याची स्फूर्ति त्यांनी घेतलेली असावी. प्रथम हे दहशतवादी ( Terrorist ) होते. साहेबाच्या चौकश्या चालू असतां भूमिगत राहून कांहीं दिवसांनी सेकंडरी इंग्रजी शाळेंत मराठी, संस्कृत, इतिहास वगैरे विषयांचे शिक्षक झाले. अशा आचार्यांस प्रथम प्रणाम.

शिवछत्रपतींचं जिणं म्हणजे एक जिवंत मराठी महाकाव्य. शिवराजांच्या " चरित्रांत व चारित्र्यांत " त्यांच्या सदर राजयोगी विभुतिमत्त्वेचा विषय वगळला तर त्यांची अर्धविभूतीच प्रकाशांत येणार. शिवचरित्राचं साहेबानें केलेलं विडंबन साहेबाने आपल्या राजकीय भूमिकेवरून करणं कदाचित् योग्य ठरेल; पण याहीपेक्षां आपल्यापैकीं कित्येकांना शिवबांच्या सदर राजयोगी भूमिकेचं ज्ञान नसेल तर तें शिवजिण्याचं आणखी विडंबन !

" आमचें अनादि " स्वातंत्र्य " शास्त्र भगवान् श्रीकृष्णानीं संस्कृत भावगीतांत–भगवत्‌गीतेंत बसवलं व कुरुक्षेत्रावर तें स्वातंत्र्य-संग्रामगत दोन सेनांच्या मधें म्हटलं. त्याच्या कोटीकोटी कॉपीज् ( अनुवाद ) तदनंतर प्राकृतांत निघाल्या. महाराष्ट्र–सारस्वतांत ज्ञानेश्वरादि साधुसंतांनीं " अस्सला " च्या तोडीच्या प्रति मराठींत काढून स्वतःच्या जिण्यांत त्या अस्सलाचा साक्षात्कार ( दर्शन ) लोकांस करवला. " स्वातंत्र्या " करतां जिणं धारेवर धरणं किंवा धारातीर्थी अर्पिणं ही मराठी संस्कृति निर्माण केली. शिवछत्रपतीनीं या मराठी संस्कृतीचं जणूं ( स्व ) राज्यारोहण केलं. राजसंन्यासाचा भगवा झेंडा उभारला. स्वातंत्र्याच्या आर्थिक वा पारमार्थिक शत्रूंचा ( गनीमांचा व षड्रिपूंचा ) निःपात केला. " [ लेखक ) खांदर 'अस्सलाकडे' ]

सहज प्रश्न असा येतो कीं शिवबांच्या वैज्ञानिक ( राजयोगी-राजसंन्यासी ) व मानव भूमिकेच्या दर्शनाचं हल्लीच्या जिण्याची मूल्यें बदललेल्या काळीं, काय प्रयोजन ? कारण हेंच कीं इमान, सेवा व मानवता हीं शिवकालीन जिण्या-वाङ्मयाची सुवर्ण-मूल्यें आहेत. तीं टिकाऊ आहेत त्यांत बदल नाहीं. प्रस्तुत काळासच काय पण आगामी कोणत्याही प्रकारच्या मानवकुळास नवयुगांत परम शांतची धारणा होण्याससुद्धां योग्य अशी तीं मूल्यें आहेत. शिवाय शिवबा सारख्या आदर्श मानवाचं पूर्ण दर्शन सदर सुवर्ण मूल्यांतच घडणार. महाराष्ट्राचा हा महान् छत्रपती साऱ्या जगाचाच काय पण नवविज्ञान युगांतील साऱ्या मानवांचा आदर्श होउं पहात आहे.

एका नामांकित वंगदेशीय अधिकारी इतिहासतज्ञानें म्हटलें आहे " शिवाजी हा भारतांत निर्माण झालेला शेवटचा **महाप्रज्ञावान्** राष्ट्रनिर्माता असून त्याची सेना, त्याचं आरमार, व त्याच्या संस्था हीं सारीं त्याचीं स्वतःची होतीं. ,, असा हा महान् राष्ट्रनिर्माता " महाप्रज्ञावान् " भारतीय राष्ट्रपुरुष भारतांतील तत्कालीन म्लेंच्छ, फिरंगी, इंग्रज वगैरे गनीमांशीं अखंड झुंज देऊन राष्ट्र-प्रपंच चालवीत असतांना त्यास आपली योग-जिज्ञासा शमन करण्यास वेळ तरी कसा मिळे याचं नवल वाटतं.

शिवचरित्रांवील कित्येक राजकारणी वा रोजकारणी गोष्टी इतिहासांला ठाऊक नाहींत. समर्थ–शिष्यांनीं वा इतर संत, शाहीर वगैरे तत्कालीन साहित्यिकांनीं गद्यपद्यांत नोंदलेल्या आख्याइका, कथा, वा प्रसंग याबद्दल इतिहास–संशोधन संशय व्यक्त करतं. तरीपण कित्येक शिवकालीन वस्तू ( टांकसाळी नाणीं भगवा झेंडा, शिला लेख वगैरे) स्थळं ( किल्ले वगैरे प्रतापगडाहून रामदसांची रामघळ, शिवथरच्या डोंगरांत एका हांकेवर–शिवबांच्या रोजच्या वाटेवर ) व्यक्ति (त्यांच्या

साहित्यांतील शिवगौरव वगैरे ) दंतकथा, आख्याइका, लोकगीतें, संत, साधु व त्यांचे शिष्य वगैरे ' शिवाजी ' या व्यक्तीची व विभूतीची साक्ष देत आहेत.

शिवबांसारख्या " प्रज्ञावान् " पुरुषाला " सेवाधर्मो महाबलः " हें सहज-योगाची युक्ति ठाऊक होती. रामदास व तुकोबांकडे वारंवार दर्शनास जाऊन ' सेवा घेत नाहींत ' म्हणून ते तक्रार करीत. समर्थ शिवबांस सांगत " तूं चालवलेला राजधर्म ही सेवाच आहे " एकदां तर समर्थांनीं शिवबांस " तूं अलिकडील जनकराजाच आहेस "; असं म्हटलं, एक संत—बखरकार सांगतात " शिवबानीं समर्थांस भिक्षेला साऱ्या राज्याच्या सनदा घातल्या तेव्हा त्यांस समर्थांनीं राज्य सेवादृष्टीनें करण्यास आदेश दिला. इमान्, सेवा व मानवता हा शिवबांच्या राजसंन्यासाचा " त्रिदंड " होताच. जोहार म्हणण्याऐवजीं " राम राम " म्हणण्याची प्रथा समर्थाज्ञेनुसार शिव-राज्यांत पडली असंही सदर बखर-कार म्हणतात.

शिवबांची लोकसेवा, देशसेवा व सद्गुरु सेवा पराकोटीला पोचलेली होती. राजकारण, राजयोग, राजगुरु, राजसंन्यास, वगैरे शब्दसंभार परमोच्च मराठी संस्कृतीचा ( ' शिव "—संस्कृतीचा ) द्योतक आहे. " स्वराज्य " माझा जन्मसिद्ध आहे व तें मी मिळवणारच या हिरीरीनें शिवराजानें व त्यांच्या प्रजेनें आपलं आखं जिणं कारणीं लावलं व स्वातंत्र्य मिळवून मराठीचं स्वराज्यारोहण केलं साऱ्यांनीं.

रामदास रानांत राहणारे लंगोटी लावून बसणारे व भिक्षेचें कदान्न खाणारे. तुकोबांची तीच स्थिति त्यांच्याच शब्दांत ऐका:—

चारी दिशा आम्हां भिक्षेचा अधिकार । न मिळे भाकर भक्षावया ।
पांडुरंगीं आमुची झाली पूर्ण भेटी । हातांत नरोटी दिली देवें ॥

अशा परम त्यागी मानवांची सेवा शिवबांनीं केली यांत शिवबांची "अलौकिक" लीनताच दिसून येते. शिवछत्रपतीनां समर्थांनी उपासनेच्या मंत्राचा अनुग्रह दिला. स्वामींनीं शिवबांच योग्य भूमिका जाणूनच थोडक्यांत समाधि लागण्याजोगा उपदेश केला, तो "लघुबोध," दासबोध १३ वा दशक समास ६ यांत आहे शिवबांची तात्काळ समाधि लागली. समाधि ही एक उच्च योगारूढ अवस्था. देहभानावर आल्यानंतर सतत सेवा घडण्याबद्दल व त्याकरतां सतत समर्थांबरोबर राहण्याची शिवरायांनीं त्यांजवळ परवानगी मागितली. समर्थांनीं शिवबांस राजधर्मच सेवाधर्माच्या भावनेनें ( With the Spirit of Service ) करण्याबद्दल त्यांस अनुज्ञा दिली. यापुढील काळ शिवरायाच्या अध्यात्मिक व राजकीय जिण्यांतील एक अपूर्व व अलौकिक चमत्कृतींनीं भरलेला उज्वल काळ होता. शिवकालीन श्रेष्ठ संत तुकाराम–रामदास यांच्या संतवाङ्मयांत शिवबांचा स्पष्ट उलेख आहे. शिवबांच्या अध्यात्मिक योग्यतेचा हा पुरावाच जणूं ! तुकोबाच्या कित्येक कीर्तनांस शिवबा स्वतः हजर असत. तुकोबांचा "समाधीचें सुख सांडा ओंवाळूनि । ऐसा या कीर्तनीं ब्रम्हरस" ॥ हा अभंग ऐकून तुकोबांकडे ते उपदेश मागण्याकरतां गेलेले असावे त्यावेळीं तुकोबांनीं त्यास खालील " उपदेश केला:— "

शिव तुझें नाम ठेविले पवित्र । छत्रपती सूत्र विश्वाचं कीं ॥
सद्गुरु श्रीरामदासाचें भूषण । तेथें घालीं मग चळो नको ॥
बहुतठायीं वृत्ति चावळली जेव्हां । रामदास्य तेव्हां कैसें घडे ॥
आत्मारामीं मन ठेऊनियां राहे । रामदासीं पाहे आपण या ॥
तुका म्हणे राया धन्य जन्मक्षिती । त्रैलोक्यीं हे ख्याति
कीर्ति तुझी ॥
राया-शिवराया ऐकावें वचन । रामदासीं ध्यान लावा वेगीं ॥

तुका म्हणे राया तुज असो कल्याण । सद्‌गुरु-शरण असे बापा ॥
शिवगौरवपर असे प्रासंगिक अभंग व ओंव्या तुकाराम-रामदासांच्या वाङ्मयांत अनेक ठिकाणीं वाचावयास सांपडतात.

जिजाबाईसारखी वीरमाता व दादोजी कोंडदेवासारखे आदर्श आचार्य यांच्या सान्निध्यांत व शिक्षणांत शिवबानां रामायण–महाभारतापासून तावत्कालपर्यंतच्या भारताच्या इतिहास-भूगोलाचं चांगलंच ज्ञान झालेलं. श्रीरामाची चौदा वर्षे वनवासमय प्रखर कर्तव्यनिष्ठा व श्रीकृष्णाची गनिमी युद्धनीति यांचे प्रामाणिक पडसाद शिवरायाच्या स्वराज्य योगांत उमटलेले आहेत. वायुवेगानें धावणारी व उजव्या हातांतील तलवारीनें शत्रूला भयानक आव्हान देणारी शिवरायांची कृष्णाश्वारूढ विभूति, स्वतःचं जिणंसुद्धां त्याच तलवारीच्या धारेवर धरणारी आहे यांत काय संशय ? राष्ट्राच्या महाराष्ट्राच्या, स्वातंत्र्याच्या संरक्षणाकरतां आपलं जिणं धारेवर धरणारा हा योगी–कर्मयोगी–राजयोगी "अस्सल" मराठी संस्कृतीचा शिवाजी हा 'अस्सल' नमुना. शिवाजी महाराजांचं राज्यारोहण म्हणजे मराठी संस्कृतीचं स्वराज्यारोहण ! स्वराज्याकरतां त्याग व भोग दोन्ही तलवारीच्या धारेवर धरलेले ( त्यागसुद्धां ॐतत्सत् अर्पण. फलाशा नाहीं. ) शिवकालीं मराठी मानव कुल अत्यंत उन्नत अवस्थेला पोंचलेलं होतं.

परमुलुखांत छापे, स्वाऱ्या, चकमकी, लढाया व स्वदेशीं राजकारण चालवणाऱ्या या राजपुरुषास धकाधकीच्या मामल्यांत विज्ञानाकडे ( योगाकडे ) लक्ष देण्यास वेळ तरी केव्हां व कसा मिळे ? पण शिवबांची योग–पिपासा इतकी जबरदस्त कीं अवकाश नाहीं जेवायला । उदंड कामें । अशा परिस्थितींतही समर्थांचं दर्शन घेण्यास

तें वेडे होत; तुकोबांच्या कीर्तनास ते हजर राहात.

"समर्थ" महाराष्ट्र धर्मांत:—

१) मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ॥

२) हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण ।
वर्तायाचें लक्षण । तेंहि असावें ॥

३) हरिकथा निरूपण । बरेंपणें राजकारण ।
प्रसंग पाहिल्याविण । सकल खोटें ॥

हीं तीनही शिवछत्रपतींनीं महाराष्ट्रांत—आपल्या राज्यांत—उत्तम तऱ्हेनें चालू दिलेलीं होतीं. मग मानवाचा "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क" प्रस्थापित होण्यास काय वेळ ? समर्थांनीं १८०० मठ (योगाश्रम), (योग-प्रशिक्षण-वर्ग-जणूं) भारतांत (काशी ते तंजावर)—त्यापैकीं १२०० खुद्द महाराष्ट्रांत होते—स्थापले. लहान-मोठ्या माणसांस "अक्षर" ओळख (Mystic literacy) करून देणारे प्रशिक्षण—वर्ग (मठ) सुरू केले. हे प्रशिक्षण वर्ग इतरत्र वा मुख्यतः महाराष्ट्रांत स्थापन होत असतांना शिवबासारख्या परम धूर्त पुरुषाला आपल्या राज्यांत काय चाललं आहे याची जाणीव होती. याच शिक्षण—वर्गांत गांवोगांव प्रवचनं, कीर्तनं, इत्यादि करून इमान, सेवा व मानवतेचा प्रभावी प्रसार करणारी दैनिक, मासिक सदृश चपळ, वाङ्मयशक्ति व माणसं तयार होत होती. त्यावेळेस विश्वविद्यालयें नव्हतीं, शाळा-कॉलेजं नव्हतीं. या शिक्षण—आश्रमांचा खर्च केवळ लोकसेवेवर (भिक्षवर), लोकसंग्रहावर अवलंबून होता. त्यांनी राजाला वा लोकांना भार असा कधीं घातला नाहीं. शिवबांसारख्या सरदार पुत्रांना दादोजी कोंडदेवासारखे विद्वान् व सुविद्य आचार्य मिळणं शक्य होतं. पण सामान्य माणसास ज्ञान,

मराठी ... ग्रंथालय ठाणे
१८१८६

"अक्षर" ओळख होण्यास समर्थांनीं उभारलेल्या सदर शिक्षण वर्गाची (मठांची) योजना मराठी संस्कृतीच्या स्वराज्यारोहणास किती उपयुक्त ठरेल याची कल्पना शिवबांत सहज आली होती. या शिक्षण-आश्रमांतही पहिलें ते हरिकथा निरूपण । दुसरे तें राजकारण तिसरे तें सावधपण सर्व "विषयीं" ॥ हें शिक्षण चालू होतं. भिक्षेचं कदान्न खाऊन लोकसेवेला सारं जिणं वाहिलेली ही मंडळी समाजांत त्याग, अवसान, उत्साह व सामर्थ्य निर्माण करण्यास योग्य ठरत व त्याबरोबरच तानाजी, एसाजी तीन "बाजी" (देशपांडे इ.) सारखे स्वातंत्र्यवीर, बाळाजी आवजीसारखे स्वामीभक्त जीव पणास लावून गनिमांशी सामना देण्यास स्फूर्ति निर्माण करीत. अशातऱ्हेनें "स्वातंत्र्य" युद्धाची अंतर्बाह्य तयारी मराठी जिण्यांत झाली होती. राजकारण व राजयोग यांची म्हणजेच प्रपंच-परमार्थाची चांगलीच गट्टी जमली होती. शिवबांनी संतापासून संपादन केलेलं "स्वराज्याचं" लोण प्रजेपर्यंत पोंचवलं यांत काय आश्चर्य ?

"मराठीचा पाया ज्ञानदेवांनीं रचला व तुका झालासे कळस" हें जितकं म्हटलं जातं तितकंच शिवकालीं मराठीचं राज्यारोहण "स्वराज्यारोहण" झालं असं म्हटलं पाहिजे. मराठीचे चार "वेद" म्हणजे ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, दासबोध, व नामदेव-तुकोबांचा गाथा. सारं वेदातलं 'अनादि विज्ञान' वाचक ज्ञानभांडार प्राकृतांत आणलं आहे सदर ग्रंथांनी. काव्य व सत्य यांचा सुंदर संगम आहे त्यांत. प्रतिभा, प्रसाद, प्रेम व "स्वातंत्र्य" देणारं हें प्राकृत वाङ्मय आहे. केवळ वाचनानें, श्रवणानें "स्वातंत्र्य" (मोक्ष) देणारं हे वाङ्मय आहे. "येथें मोक्षचि असे आयता । श्रवणाच माजीं ॥ ज्ञानेश्वरी या ग्रंथांच्या वाचनानें, 'श्रवणानें" मराठी संस्कृतींत गेल्या ५०० वर्षांत आदर्श मानव तयार झाले व ते कीर्ति करून "स्वराज्यांत"

विलीन झाले. केवळ प्राकृत म्हणून ( संस्कृत नव्हे म्हणून ) कुणी जर या ग्रंथास नांवं ठेवील तर तुकोबा म्हणतात.

वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। इतरांनीं वहावा भार माथां ॥ संस्कृत पंडितांनीं जेव्हां प्राकृत म्हणून "मराठी" ला कमीपणा आणण्याचा प्रयत्न केला तेव्हां त्यांच्या वर्मी तुकोबांनीं सदर घाव घालून पंढितांना "भारवाही" म्हणून "रामटोला" हाणला. वेदांचा "अर्थ" म्हणजे "स्व" राज्य. अर्थ कळणं म्हणजे अर्थ होणं [ Self-sustained, Self-sufficient, Self-realized ] आपला आपण होणं.

शिवकालीं भक्तीच्या स्वर्गंगा वहात होत्या मराठी जिण्या-वाङ्मयांत. भक्ति म्हणजे प्रेम, सेवा, त्याग ( इमान, सेवा, मानवता ) मराठी राज्यांतील १२०० समर्थाश्रमांत सत्यसंकल्पाचे कल्पतरू मनास मागें टाकणाऱ्या वेगानें ' वाढत होते. मराठी राज्यांतील गृहस्थाश्रमांत सद्-वासनांच्या काम-धेनू उत्साहानें प्रपंच करीत होत्या. मराठी जिण्यांतील राजकारणी पुरुष युक्ति-बुद्धीचे "चिंतामणी" होते जणूं! शिवराज्यारोहण ( "स्व"राज्यारोहण ) म्हणजे मराठी मना-वरच काय पण भारत मानसावर झालेला एक उत्कट व भव्य संस्कार ! या महामंगल प्रसंगीं साऱ्या मराठी जिण्या-वाङ्मयांतील योग्य व्यक्ति-विभूतीनां मोलाची बक्षिसी दिली गेली शिवराजाकडून. मेहतरास मात्र बक्षिसी मागण्यास मुक्तद्वार ठेवलं होतं शिवछत्रपतींनीं. चमत्कार म्हणजे शिवबांची स्वामिभक्तीच मागितली मेहतरानें. हा मेहतर म्हणजे शिवरायाच्या विश्वासांतील एक कनिष्ठ सेवक, दिल्लीपतीच्या नजर-कैदेंतून आग्र्याहून शिवाजी-राजे निसटून जातांना त्यांनीं आपल्याच शय्येवर तोतया बनवून निजवलेल्या हिरोजीचे पाय चेपणारा व वेळ पडल्यास मोगलांना बळी जाण्यास तयार असलेला, शिवबाशीं इमान,

सेवा सांभाळणारा हा मानव ! हिरोजी फर्जेदबरोबर जीव पणास लावणारा, शिवछत्रतींच्या सिंहासनाखालील उंची बैठकीची साफसफाई करण्याचं काम मागितलं त्यानं. मागणें ते किती। दाता लक्ष्मीचा पति ॥ तुकोबांच्या त्यागी भक्तीची आठवण झाली असेल साऱ्या शिव–दरबाराला ! स्वामीच्या पायधुळीनें पुनीत झालेली बैठक. श्रेष्ठ स्वामीभक्तीचं स्वच्छ प्रतिबिंब पडलं होतं त्या कनिष्ठ दर्जाच्या सेवकांत, तन, मन, धन, सारं स्वामीरूप ! समर्थांच्या शब्दांत सांगायचं म्हणजे हरि ( स्वामी ) भक्त वैभवें कनिष्ठ। परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ। सदासर्वदा संतुष्ट नैराशबोधें ॥, प्रेमानें सेवा करणारा हा कनिष्ठ सेवक. काय हा शिव–संगीताचा महिमा ! शिवछत्रपति म्हणजे सत्यनिष्ठ स्वामीच. मेहेतराचा त्याग ही स्वामीची शक्ति कीं सेवाधर्माची महती ? सगळं एकच होतं स्वामी–भक्तींत. शिवबांच्या प्रेमाच्या पुण्यप्रवाहांत सदा डुंबणारे कित्येक स्वामीभक्त त्या काळीं झाले. तानाजी, दोन बाजी इत्यादि सारखे मोहरे स्वामी प्रेमाखातर आपल्या जिण्याचा आत्मयज्ञ करीत. या लोकस्वामीचेसुद्धां एक “ समर्थ ” स्वामी होते. स्वराज्याचा स्वामी व स्वराज्याचा सेवक ह्या दोघांमध्यें समतेनें खेळून तीव्र–त्याग उत्पन्न करणारी शिवाची चैतन्यमय शक्ति ही. कीं भक्ति ? कीं अगदीं सामान्य माणसांकडून वेळीं ' असामान्य ' त्याग करवणारी योग शक्ति ?

इतिहासाला ठाऊक नसेल शिवबांची राजयोगी विभूतिमत्ता, नसूं द्या ! पण लोकगीतांना ठाऊक आहे ती. लोककथांना ठाऊक आहे ती. संतानां ठाऊक आहे, समर्थांना ठाऊक आहे. भारतांतील तत्कालीन १८०० मठांतील साऱ्या समर्थ-सेवकांना ठाऊक आहे. तुकोबांना ठाऊक आहे ही राजयोगी विभूतिमत्ता. आपल्यास ठाऊक नसेल तर शिवबांच्या जिण्याचं तें विडंबन होईल. सदर मानवांनीं शिवशक्तीची

नोंद केलेली आहे आपल्या वाङ्मयांत. साहेबाचा हा "डोंगरांतला उंदीर सह्याद्रीचा प्रतापसिंह ठरला." मुखदुर्बळ शिवाजी "महामौनी" निघाला. सार्वभौम् दिल्लीपतीच्या प्रखरनजरकैदेंतून गुप्चुप् हा मौनी आग्र्याहून निसटला तेव्हां साहेबांला व साऱ्या भारताला म्हणे या मराठी राजाच्या परम-गूढ बुद्धीने एक आश्चर्याचा हादरा दिला. या "अक्षरशत्रू" च्या जिण्यावर इमान, सेवा व मानवता-दर्शक भव्य वाङ्मय, मराठींतच काय पण इतर भाषांतही उभारलं गेलं आहे. या "लुटारू" नें मोगल, मुसलमान, फिरंगी, इंग्रंज वगैरे गनीमांना लुटारू ठरवलं! शिवकालीन जिणं जसं सर्वस्वी पौरुषपर होतं तसंच संतवाङ्मय ( रामदास-तुकारामांच ) पौरुषपर-काळावर सुद्धा मात करायला सांगणारं आहे.

इतिहासाला ठाऊक नसलेलं शिवरायाचं व त्याच्या प्रजेचं "स्वराज्यारोहण" शिवकालीन स्वराज्यांतील आदर्श पुरुष समर्थ रामदास व संततुकाराम यांच्या समर्थ व अभंग वाङ्मयांत अजरामर झालं आहे. मराठी संतवाङ्मयांतील "स्वराज्य" व शिवकालीन स्वराज्य यांतील "निकराचे निष्कर्ष" म्हणजे इमान ( सत्यनिष्ठा-स्वामी निष्ठा ) सेवा ( स्वा ीसेवा ) व मानवता कोणत्याही अनादि वा आगामी मानवकुलास "स्वराज्य" स्थापनेंत आदर्श ठरतील.

समर्थांचा रोज–संन्यास व शिवराजाचा राज-संन्यास परस्परांस चांगलाच आवडला असला पाहिजे. व त्यामुळेंच "परस्पर देवो भव" हें ब्रीदवाक्य राजा व प्रजा यांच्या रोम-रंध्रात खेळून राहिलं होतं जणूं. महा-राष्ट्रांत बाराशें ( भारतांत १८०० ) गुरुदेवश्रमांची होणारी 'समर्थ' स्थापना शिवरजानें एरवीं रातोरात थांबवली असती. त्या बरोबरच समर्थांना शिवबांची अध्यात्म निष्ठा, महाप्रज्ञा ठाऊक होती म्हणूनच त्यांनीं परमार्थाचा पसारा मराठी राजप्रंपचात केला. नाहींतर त्यांच्या

९८९८६

सारख्या भिक्षेवर व रानांत राहणाऱ्या अवलीयाला हिमाद्रि इतर योग्यांसारखा मोकळा होता. ( आतां वेडे व चोर यांच आक्रमण हिमाद्रींत चालू आहे. "अस्स लाकडे" ) पण सह्याद्रीतंला हा राजयोगी शिवराजा त्यांस "अल्किडल्या जनका" प्रमाणें वाटला यांत नवल काय ? शिवबाचं क्षत्रियतेजच तसं होतं.

शिवछत्रपतींचं राज्यारोहण म्हणजे मराठी जिण्या-वाङ्मयांच स्वराज्या-रोहण. भोग व त्याग यांच्या प्रीतिसंगमांतील अमृतानुभव. शिवप्रभूची प्रजा त्यामुळें कृतार्थ झालेली. राजाचं त्यागाचं, इमान, सेवा व मानवतेचं ब्रीद प्रेजच्या रोमरंध्रांत अष्टभाव जागृत करणारं. राजकार्य, स्वराज्यकार्य, स्वामीकार्य करतांना अष्टभाव जागृतीच्या जाणीवेंत जो तो जीव पणास लावी. स्वराज्याकरतां, स्वामीकरतां म:रण म्हणजे एक पोरखेळ. हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ! ही स्वर्गोपभोगाची वा स्वराज्योपभोगाची इच्छा सुद्धा मराठी मनानें जिंकली होती जणू ! स्वामी-भक्ति, देशप्रेम लोकसेवा अशा 'समर्थ' स्वरूपांत मराठी जिणं-वाङ्मय धन्यता पावलं होतं. शिवराजा म्हणजे पुण्यश्लोक, न्यायनिष्ठा, शरणागत शत्रूचीही प्रतिष्ठा संभाळणारा छत्रपति ! महान् राष्ट्राचा महाराजा !

समर्थांची शिवबावर अलौकिक माया होती; अगदीं कल्याण उद्धव इत्यादि शिष्यांवरील माये इतकी. रामदास-माऊलीच ती. ज्यां काळी शिवनिर्वाणाची बातमी सज्जनगडावर आली त्या वेळीं शिष्यमंडळींत बसलेले समर्थ एकदम उठून "श्रींची इच्छा" असं म्हणत आंतल्या खोलींत गेले. आनंद-वन भूवनात त्यानीं शिवहस्ते झालेला म्लेंच्छसंहार पाहिलेला. 'बुडाला औरंग्या पापी' असे आनंदोद्गार त्यानीं काढलेले. शिवछत्रपतींचं राज्यारोहण त्यांनी पाहिलेलं. मराठी संस्कृतीचं "स्वराज्यारोहण" सुद्धां त्यांनी पाहीलेलं त्यांना

इतर मंडळी बरोबर न राहतां मायेच्या पडद्याआड क्षणभर व्हावसं वाटल्यास नवल नाहीं. जिजामाऊली इतकाच पुत्रशोक या गुरुमाउलीला झाला. जिजामाउलीचं निर्वाण अगोदरच्च झालेलं नाहींतर इतिहासाला-मराठी जिण्याला एक असह्य दुःखाचा हादरा बसला असता. शिवबांच्या लौकिक विभूतिमत्तेबरोबर रामदासांना शिवबांच्या अलौकिक भूमिकेचीही जाणीव होती. एक वर्षानंतर लगेच त्यानी पण आपला देह ठेवला. असे हे मराठी वाङ्मय-जिण्यांतील दोन "समर्थ" पुरुष "स्वराज्यांत" विलीन झाले. शिवकालीन मराठी मानवकुलाचं "स्व"-राज्यारोहणच जणूं ! !

अनादि वेदविद्येचं वर्म इमान, सेवा व मानवता मराठी जिण्या-वाङ्मयांत जागवून "आधीं केलें न मग सांगितलें" या श्रेष्ठ पौरुष श्रेणींतले, राष्ट्रच काय पण महा-राष्ट्र उभे करणारे, भारतच काय पण "महा-भारत" जणूं रचणारे, जिण्या-वाङ्मयांत क्रांतीच काय पण उत्क्रांति साधणारे हे दोन युगपुरुष एकामागें एक कालातीत झाले. 'एकीएक' झाले.

सर्व धर्मामध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ॥ समर्थ-दासबोध ॥

मानवाचा वेदोक्तधर्म म्हणजे "स्वरूपीं राहणें हा स्वधर्म" स्वराजीं विराजमान होणें हा स्वधर्म, हा मानवधर्म. एकतत्व हेंच "स्वरूप". एकतत्वांत "स्व"-राज्य सहज आहे. दुजाभावच नाहीं तिथें. सर्व जीव समान. आचार, उच्चार, विचार, यंत्र, तंत्र, मंत्र; जप, तप, योग; नाम, संत, सद्गुरु इत्यादि साधनें "स्व"-राज्य सिद्ध करण्याकरतां आहेत (विविध धर्मांचे आचार, उच्चार विचार पण). सर्व धर्मांचे मूळ एकतत्व. पण या मूळ स्वरूपाला, परम अर्थाला विसरून धर्माधर्मांचा अहंकार बळावला व सरते शेवटीं धर्माला स्वार्थाचं, राजकारणाचं स्वरूप प्राप्त झालं, तेव्हां दोन धर्मीयांत द्वेष, मत्सर,

जुल्म, बाटाबाटी सुरू झाली. भारतीयांनीं असले परधर्मीयांवर जुलूम, वा बाटाबाटी केली नाहीं तरी स्वधर्मांतच आचार विचारांचीं खुळं ( भ्रम ) निर्माण केलीं. पण भारतीय संतांनीं इतरत्र व मराठी संतांनीं मराठींत " स्वरूपाची " स्व-देशाची " स्व"-धर्माची मूळ एकतत्वमय प्रतिष्ठा आपल्या जिण्या-वाङ्मयांत संभाळली त्या संतांचे काय उपकार सांगावे ! शिवबांना तर दोन अस्सल मराठी संत ( समर्थ तुकोबा ) इमान, सेवा व मानवता संभाळण्यांत प्रत्यक्ष सहकारी होते. शिवबांच्या स्वराज्यांत इमान ( निष्ठा ), सेवा व मानवतेच्या अजब गोष्टी घडल्या आहेत. ( शरणागत शत्रूची ही प्रतिष्ठा संभाळणारा हा पुण्यश्लोक राजा ) शिव, शिवप्रभूच्या स्वरूपांत स्वधर्मीयांची वा परधर्मीयांची मानवतेवर ( मानवाच्या " स्वातंत्र्या " वर ) होणारीं आक्रमणं ( बाटवा-बाटवी, जुल्म, बुवाबाजी ) मोडून काढण्याकरतां अवतरला होता जणूं ! " अस्सल " स्वराज्य म्हणूनच सिद्ध झालं मराठींत !

---

( निबंध २ रा )

# मराठींचें स्वर्गावरोहण

" शाहीर, तमाशा, बुवा वगैरे उत्तम वाङ्मयसंस्था ( शिव-कालीन ). महाराष्ट्रांत स्वातंत्र्य युद्धाच्या वेळीं लावण्या, पोवाडे, प्रवचनांनीं त्याग, वीरश्री व निरपेक्ष प्रेम उत्पन्न केलें. स्वातंत्र्याचा श्रीगणेशा झाला पण अखेर याच संस्थांचीं चैनी संस्थानं बनलीं. बुवांनीं आपल्या संस्थांचीं संस्थानं बनवून लोकांचे प्रपंच " साफ " केले. बायांनीं या संस्थांचा " तमाशा " करून लोकांचे प्रपंच साफ

केले. बुवा व बाया यांचा स्वातंत्र्य कमावण्यांत व गमावण्यांत वांटा सारखाच आहे. ‘ लोकांनीं बुवाच्याही नादीं लागूं नये व बायांच्याही नादीं लागूं नये, असं लोकमत आमच्या मुलांच्या काळीं ( विसावं-साल, विशीचंवय (Teenager) व विसावं शतक ) तयार झालं होतं ” [ ‘ अस्सलाकडे ’ लेखकः खांदर ]

( संत मुकुंदराय-ज्ञानेश्वर ते संत तुकाराम ) संतवाङ्मय हा मराठी वाङ्मय-जिण्याचा पाया आहे. तदनंतरच्या मराठी वाङ्मयांत रचिल्या गेलेल्या काव्य, महाकाव्य, नाट्य कादंबरी विनोद वगैरे साहित्यानें सदर पायावर भव्य प्रासाद उभारून आंत वाक-अर्थाची गंगाजळी तयार केलेली आहे. पोवाडे लावण्या, काव्यं, प्रवचनं कीर्तनं संघटना इत्यादि वाङ्मय-शक्तिद्वारा शिवकाळीं प्रथम १६४७ मध्ये स्वराज्याचा श्रीगणेशा झाला. पुढें केवळ ३० वर्षांतच शिवबांचं राज्यारोहण होऊन स्वराज्य सिद्ध झालं. सान्यांना मराठींत “ अक्षर ”-ओळख होऊन मराठी जिणें श्रेष्ठ पदवीला पोचलं. गीतारहस्यकार लो. टिळकांच्या “ स्वराज्य ” माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच “ या घोषणेंतील ” “ स्वराज्य ” विश्व-व्यापी स्वराज्याचं प्रतीक नसेल असं कुणी सांगावं ? मराठी संत-वाङ्मयाची फलश्रुति म्हणजे ‘स्वराज्य,’ सत्य संशोधन !

शिवनिर्वाणानंतर मराठी **जिण्यांत** रातोरात मोंगलाई माजली. “ बेबंदशाही ” नाटक झालं. ह्या मराठी-मोंगलाई पासून तो आंग्लाई पर्यंत (१८१८) शिवस्वराज्यांतील त्यागी मराठी जिण्याची धार बोथट होत चालली होती. स्वतंत्र मराठी जिणं राग-द्वेषाचं फंद फितुरीचं, चैनी-विलासांच गुलाम होऊं लागलं होतं. मराठी लक्ष, स्वराज्यांत ( व पहिल्या दोन पेशव्यांनीं मुलुख गिरी करून ) कमावलेल्या ऐश्वर्याच्या उपभोगांकडे वेधलं गेले. शिव-स्वराज्यांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकृत
अनुक्रम ४६६ दि: १०।७।५१
वर्ग २१२७ ३०।३।०७

उपभोगांकडेच काय पण भोगांकडे ही लक्ष पुरवण्यास कुणाला वेळ नव्हता. " अवकाश नाहीं जेवायला ! उदंड कामें । ' अशी समर्थ साक्ष आहे " स्वराज्य " काळची. स्वराज्यांतून निघून स्वर्गसुखांच्या स्वप्नांत मराठी जिणं गुंग होत चाललं होतं. सत्तालोलुपता, परस्पर द्वेष, मत्सर, फंदफितुरी, बे-इमानी, विलास-प्रियता, हळूंहळूं वाढत चालली होती मराठी जिण्यांत पहिल्या दोन पेशव्यांनीं मराठ्यांची मर्दुमकी अटकेपार गाजवली व नर्मदेपालिकडे शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड इत्यादिनां कायमची सरदारकी दिला. पुढें मराठ्यांनीं दिल्लीच्या डोलाऱ्यालाही धक्का दिला, पण स्वराज्याबाहेरील मराठी मर्दुमकी वाढत असतां स्वदेशांत अंतस्थ स्थिती वर म्हटल्याप्रमाणें सत्ता-लोभ, द्वेष, फितुरी, विलास-प्रियता वगैरे गुणांनी खालावत चालली होती. 'भाऊबंदकी', 'तोतयांचीं बंडं', स्वामी द्रोह, नाच-तमाशे यांना " बहर " आला होता.

शिव-स्वराज्यांत निर्माण झालेली मराठी शक्ति आपल्या ऐश्वर्याच्या उपभोगांत झपाट्यानें खर्ची पडत होती. " वैऱ्यांची रात्र आहे जागा रहा " अशी आरोळी ( " आकाश "-वाणी जणूं ) उठे ' पण लक्षांत कोण घेतो ? ' वरील घातकी गुणांच्या आहारीं जाऊन ही मराठी शक्ति मदांध झालेली होती व स्वराज्यामोंवताली टपून बसलेले गनीम ( इंग्रज, फिरंगी, फ्रेंच वगैरे परदेशीय ) त्यांस दिसेनासे झाले होते. पेशवाईच्या अखेरीस तर शाहीर, बुवा, तमाशा यांचीं संस्थानं बनून लावण्या पोवाडे वगैरे वाङ्मय वीररसापेक्षा शृंगाराने भरलेलं होतं. पुढें साहेबाच्या राज्याची " जन्मठेप " १५० वर्षांवर पत्करावी लागली मराठी जिण्याला ! मराठींत, सामान्य माणसाची स्थिति जरी सामान्यच राहिली तरीसुद्धां मराठी कारकीर्दीत सामान्य मराठी माणसं आपापल्या लष्करी नेत्याशीं व मराठी कार-

कीर्दीनंतर मराठी पुढाऱ्यांशीं इमान संभाळून राहिले. इमान, सेवा व मानवतेचा सामान्य मराठी माणसांवर झालेला असामान्य शिवकालीन संस्कार अखेर टिकाऊच ठरला. सामान्य मराठी माणसाचं असामान्य जिणं तें हेंच !

तरीसुद्धां **वाङ्मयांत** वामन पंडित, मोरोपंत, रघुनाथ पंडित, श्रीधर इत्यादि विद्वान पंडित–कवींनीं किंवा राम जोशी, अनंत फंदी, होनाजी बाळा, प्रभाकर, वगैरे शाहीर–कवींनीं मराठी **वाङ्मयाची** प्रतिष्ठा संभाळून त्याचं विडंबन होऊं दिलं नाहीं. रामायण, महाभारत, इहिहास, पुराण, इत्यादितील व्यक्ति–विभूति, उदात्त प्रसंग इत्यादि **मराठी वाङ्मयांत** आणून मराठी वाङ्मयाचा दर्जा चांगलाच संभाळला. सदर कवींना राजाश्रयाची पर्वा नव्हती. ते स्वयंभू स्वतंत्र वाङ्मय-सृष्टि निर्माण करणारे होते. त्यामुळें मराठी **जिण्याइतकं** विडंबन मराठी **वाङ्मयाचं** झालं नाहीं.

संतांनीं ( ज्ञानेश्वर ते तुकाराम ) संस्कृतांतील वेद, रामायण, महाभारत, पुराणं इत्यादि वाङ्मय सोपं व रुचकर ( प्रासादिक ) असं मराठी भाषेंत केलेलं होतं. सदर पंत-पंडितानीं वरील वाङ्मयावर आपल्या प्रतिभेने दर्जेदार काव्यं उभारलीं. उपरिनिर्दिष्ट शाहीर मंडळीनीं मराठींत स्वर्गीय जिण्याचे पडसाद निर्माण केले. लावण्यांत मराठी भाषासुंदरीचं लावण्य स्वर्गीय अप्सरांसारखं वाटूं लागलं. पोवाडे वीररसानें भारलेले व भरलेले होते. या मंडळीनीं आपल्या काव्य, पद्य साहित्यांत मराठी भाषेला मनोहारी नृत्य करावयास लावून रागदारीनें तिच्याकरवीं स्वर्गीय मधुर गानसुद्धां करवलं आहे.

इंग्रजीनंतर ( १८१८ नंतर ) मराठी वाङ्मय-जिण्याची पीछेहाट सुरूं झाली. हळूहळूं भारताचं निःशस्त्रीकरण साहेबानें केलं १८१८-१८५७ पर्यंतचा काळ मराठी **वाङ्मयास** अत्यंत मंदीच

गेला, तरीपण मराठी जिल्ह्यांत व इतर भारतांतसुद्धां ठिकठिकाणी बंडाच्या उठावाचा " दारूगोळा " गुप्तपणें तयार होत होता. त्याचा स्फोट १८५७ सालीं साहेबाविरुद्ध भारतभर झाला. झांशीची मर्दानी राणी, तात्या टोपे, नानासाहेब पेशवे वगैरे स्वातंत्र्य योध्यांचा साहेबांच्या धूर्त राजकारणापुढें व लांब पल्ल्याच्या तोफाबंदुकांपुढें टिकाव लागला नाहीं. पुन्हां असा देशव्यापी बंडस्फोट होण्याची शक्यता पार मावळली.

" तदनंतर गुप्त कट व गुप्त मंडळ्या यांचं जाळं अखिल भारतांत पसरलेलं. जुलमी साहेबांस ठार करण्याचे व साहेबाचं राज्य उलथून पाडण्याचे कट जिकडे तिकडे भारतभर होत. साहेबाच्या राजकारणास बळी पडून कुटुंबें दुबळी होत होती. कोणत्याही लढ्याची तयारी शिक्षेविना होत नसते. लोकमान्य-महात्मे पुढारी व्याख्यानद्वारा, संघटनेद्वारा अनेक चळवळीद्वारा स्वातंत्र्य लढ्याला लागणारी तालीम लोकाकरवी गांवोगांव करून घेत होते. आपल्या दुबळ्या जिण्याची जाणीव प्रत्येकास पहिल्या जागतिक युद्धानंतर होऊं लागली होती. परमार्थांत " राम " असला तरी दैनंदिन जिण्यांत ' राम ' नाहीं हें पटत होतं साऱ्यांना. होतकरू मुलांच्या जिण्याला धकाधकीचे शिक्षण मिळून योग्य वळण लागणं इष्ट होते. त्या दिशेनें मुलांच्या भावनांना व चाळे चळवळींना ( activities ना ) योग्य कलाटणी देण्याचं काम लहानमोठे पुढारी करीत होते. " ( ले. खांदर-अस्सलाकडे ).

छापण्याच्या कलेमुळें सर्व प्रांतीय भाषांत साहित्याला बहर येत चालला होता. मराठींत पुण्या-मुंबईकडील मंडळी व इतरत्र विदर्भीय वगैरे मंडळी मराठी शारदेचे लक्ष्मपुत्र होते. त्यांनीं भगीरथ श्रम करून गुप्त झालेली वाग्-अर्थाची स्वर्गंगा महाराष्ट्रां। खेळवली, काव्य. नाट्य, कादंबरी, ललित निबंध वगैरेनीं मराठी जिण्या-वाङ्मयास

स्वर्गीयता आणली. या साहित्यस्वर्गात, मराठी वर्तमानपत्रं, मासिकं इत्यादींनीं व थोर साहित्यश्रेष्ठींनीं तर या नव युगांतील आचार-विचारांत क्रांति व उत्क्रांति करण्याची शक्तिधारण केलेली आहे. माणसांत, कुटुंबांत, समाजांत, राष्ट्रांत, क्वचित् साऱ्या विश्वांत आचार-विचारांची आंदोलनं हीं करूं शकतात. लोकांच्या राजकारणाच्या वा रोजकारणाच्या "मामल्यांत" हस्तक्षेप करून त्यांना "योग्य" तें वळण लावण्याची सदर नियतकालिकांची शक्ति असामान्य आहे. शिवकालीं हीच समर्थ वाङ्मयशक्ति पोवाडे, कथा, कीर्तन, प्रवचनं इत्यादि द्वारां गांवोगांव लोकमानसांत आंदोलनं उत्पन्न करीत होती. वाङ्मय शक्तीचे अचाट खेळ खेळणारीं चित्रपट, दूर चित्रवाणी वगैरे नवतंत्रेंही हळू हळूं वापरण्यांत येत आहेत देशांत.

विसाव्या शतकाच्या सुरवातीस व दुसऱ्या महायुद्धानंतर नवविज्ञान युगाची छाप मराठी जिण्यावर पडणं सहाजिक होतं. जिण्याचं जाऊं द्या पण वाङ्मयावरही या नव छाया पडत आहेत. मराठी संतांनीं व शिवराजानें केलेलं स्वराज्यारोहणाचं थोडं विस्मरण पडून जिण्या-वाङ्मयाचं **स्वर्गावरोहण** झालं आहे. स्वर्गीय-जिण्या वाङ्मयाचं ध्येय केवळ करमणूक व आनंद नसून "स्वातंत्र्य" प्रेमाची धार तीव्र राहावी हें असल्यास परस्वाधीन जिणं होणार नाहीं. नवयुगीनकाळीं पुष्कळ गोष्टींची मूल्यं बदललीं असलीं तरी काळावर मात करणारी शिवकालीन स्मृति व उपभोगांच्या आहारीं न जाणारी शिवकालीन कृति यांची विस्मृति होण्यांत 'स्वातंत्र्या' ला धोंका आहे. नुकत्याच पाकिस्तानशीं झालेल्या भारताच्या विजयी मुकाबल्यांत शिवकालीन धारातीर्थाचा जीर्णोद्धार झाला आहे. तरी केवळ स्वर्गीय सुख-भ्रमांत न राहतां जिण्या-वाङ्मयांतील शिव-शक्ति संपादन करीत राहणें इष्ट आहे.

थोडक्यांत म्हणजे ( एकतत्व सिद्ध करणाऱ्या ) संतांच्या जिण्या-वाङ्मयकालानंतर अद्यावत नवयुग-वाङ्मयकालापर्यंत, मराठीचं **स्वर्गावरोहण** झालं आहे. अगदीं अक्षर-शत्रूपासून तों " अक्षर " ओळख झालेल्या विद्वानांपर्यंत साऱ्यांना स्वर्गीय आनंद देणाऱ्या साहित्य, संगीत, कला इत्यादि तयार होत आहेत. इतकंच काय मानव-युगांतील नवविज्ञानशास्त्र ( गृहशास्त्रापासून तों अणु आकाश शास्त्रापर्यंत Atom & Space Science) सोपं करण्या इतकी शब्द-समृद्धि व भाषा सामर्थ्य मराठींत आलं आहे. अशा या समृद्ध समर्थ मराठीला नवविज्ञान-शास्त्र आत्मसात् करण्यास कितीसा वेळ लागणार ? ज्या मराठी जिण्या-वाङ्मयानें अनादि-विज्ञान आपल्या जिण्यांत प्रत्यक्ष साकार करुन दाखवलं त्यास केवळ अणू-आकाशस्थ जडविज्ञान आत्मसात् करण्यास कांहींच काळ लागणार नाहीं. तरीपण जिण्या-वाङ्मयाचं स्वर्गावरोहण व स्वराज्यारोहण यांतील विरल संधी-रेखा साधून वेळ पडल्यास " स्वराज्यारोहणाकरतां जिणं धारेवर धरण्याची तयारी ठेवली पाहिजे साऱ्यांनी. कारण भाषेला सामर्थ्य, सौंदर्य, माधुरी हीं जरी आलेलीं असलीं तरी मानव जीवनाचा परम अर्थ जागवणारी संत-प्रज्ञा ( सत्संकल्प व विवेक समृद्धि ) पण मराठींत चित्रित व्हावयास पाहिजे. तरच या नित्य बदलत्या विश्वांत स्थिरता प्राप्त होणार मराठी माणसाला.

साहित्य-शक्तीचा जिण्यावर व जिण्याचा साहित्य शक्तीवर विशेषतः नवजवानांवर ( Teenagers ) प्रौढ मुलांवर काय परिणाम होतो तो " अस्सलाकडे " या पुस्तकांतील खालील वेंचक उताऱ्यांत वाचा:—

" मराठीस महाराष्ट्र सारस्वताचं संशोधन व आपल्या मुलासारखं संगोपन करणारे **विद्वान लक्ष्मीपुत्र लाभावे** हें मराठीचं सौभाग्य होतं. वाङ्मय व जीवन यांची चांगलीच गट्टी असल्यानें जिण्यांतरा

उणीवा वाङ्मय भरून काढी. मुख्यतः मुंबई–पुण्याकडील मराठी शारदेचे आजन्म उपासक मधून मधून व्याख्यानें, प्रवचनें, कीर्तनें, पुराणं इत्यादिद्वारा गांवोगांव बौद्धिक व अध्यात्मिक वाङ्मयाचा अमृत वर्षाव करीत. त्यावेळेला देशभक्तीचं साहेबाला वावडं होतं. एरवीं देवासारखा वागणारा साहेब देशभक्तीचा 'ब' ऐकला तरी राक्षसारखा वागे. घरावर गाढवाचा नांगर फिरे, इस्टेट जप्त होई. मराठी, त्यागी वा राजयोगी जिण्याचा प्राण "शिवाजी" नामशेष केला होता साहेबानें! लोकांचे शिरावर टांगती तलवार "जन्मठेपे"ची. तरी पण मराठी माणूस 'शिवशक्ती' व 'शिवस्फूर्ति' कधींच विसरला नाहीं अंतर्यामीं! ("अस्सलाकडे" ले. खांदर)

"हे शारदेचे लक्ष्मीपुत्र साऱ्या गांवांना सरस वाङ्मयाचं रसपान करवीत, त्यामुळें वाङ्मय वसंत बारा महिने बहरलेला असे. शाळें-तील शिक्षणापेक्षां शाळेबाहेरील शिक्षण प्रौढ मुलांना फार मोलाचं मिळालं. उत्तम गांवकऱ्यांची परंपरा, कार्यकर्त्या व्यक्तींचा उत्तम आदर्श यामुळें मुलांचा जीवन-विकास वेगानें झाला. भावी काळीं विभूति होऊं घातलेली ही बाल-गोपाळ मंडळी व्यवहारांतले टक्केटोणपे हंसतखेळत खावयास शिकलीं. Learning by doing and Learning while earning या शिक्षेमुळें प्रत्येक जण समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून वागावयास शिकला. इमान, कर्तव्यनिष्ठा कृतज्ञता, आत्मविश्वास वगैरे श्रेष्ठ गुणांबरोबरच, सौजन्य ( Gentlemanliness ) मनमिळाऊपणा, प्रामाणिकपणा वगैरे व्यवहारी गुणांची वृद्धि होऊन त्यांच्या भावी जीवनांत लोकसंग्रह व सेवा करण्यास उपयुक्त ठरलीं. ही सारी लोकमान्य–महात्म्यांच्या व त्यागी लोकसेवकांच्या वाङ्मयाची ताकद, साहित्याची शिवशक्ति!"

[ "अस्सलाकडे" ले. खांदर ]

"१९२० च्या मॅट्रिक संमेलनानंतर अवघ्या सहा महिन्यांतच महात्म्याच्या अधिष्ठानाखालीं स्वातंत्र्य संग्रामाला सुरवात झाली. लोकमान्यांच्या सेनानित्वा खालीं ( साहेबाविरुद्ध ) पहिलं 'महायुद्ध' लढलं गेलं. प्रतियोगी सहकारिता हें त्याचं तंत्र. पण दुसऱ्या "महायुद्धांत" तें तंत्र फिरलं. अहिंसक असहकाराचीं शस्त्रास्त्रें भारतभर वापरण्यात आलीं. आमच्या मुलांनीं शाळा, कॉलेज इत्यादि बहिष्कारांत उड्या घेऊन आपलं जिणं बरेच वर्षं धारेवर धरलं होतं. "देशाच्या सात्विक स्वभावास मानवणारें स्वातंत्र्याचें साधन तयार झालें होतें. विविध साधकांची या अहिंसक रणक्षेत्रांत सोय झाली. अगदीं हिमालयांत गेलेले, बाराबारा वर्षं तप केलेले साधक देशाचं ऋण फेडण्याच्या बुद्धीनें रणांगणावर चमकूं लागले. एकाद्-दुसऱ्या केवळ आत्मशोधनांत सांपडलेल्या विभूतीला सुद्धां ही अहिंसक लढाई साधनीभूत होऊन बसली. त्यागांत भोग व भोगांत त्याग असं दुहेरी सुलभ साधन मिळाल्यानें या धारातीर्थीं सर्वांनीं सचैल स्नान केलें. "साधी रहाणी व उच्च विचारसरणी" नें वागणारे प्रामाणिक क्रिस्तधर्मीयही "नवं बायबल" सांपडलं म्हणून या युद्धांत भाग घेत होते. स्वातंत्र्य प्रेमानें वेडे होऊन कांहीं सच्चे पैगंबर-भक्त वेडेपीर नसूत सच्चेपीर बनलेले या चळवळींत होते. त्यागांत संतुष्ट होऊन अग्नि दिव्य करणारे कांहीं झरतुष्ट ही या अग्नि दिव्यांत स्वखुशीनें सामील झाले. सर्वांस ही लढाई सहज सुलभ झाली. ही सारी लोकमान्य-महात्म्याच्या वाङ्मयाची ताकद साहित्याची शिवशक्ति कीं शिवकालीन स्फूर्ति ! ( 'अस्सलाकडे' खांदर )

कोणतीही क्रांतिकारक शक्ति असली तरी तिचा उपयोग करतांना मराठीचं उत्क्रांती कारक स्वराज्यारोहण व्हावं नी मराठीचं केवळ स्वर्गारोहण होऊं नये हेच मागणें !

———

(निबंध ३ रा)

# — अस्सलाकडे —

## -- TOWARDS SELF-REALIZATION —

"आपल्या ह्या भूमातेवर वेदकाळापासून म्हणजेच अनादिकाळापासून अध्यात्मास सुरवात झाली. ऋषीमुनींनीं वेदप्रणीत सत्याचा स्वतः अनुभव घेऊन नानातऱ्हेचीं दर्शनें तयार केलीं. कांहीं तार्किकांच्या दृष्टीनें वेद व पुराणांतील वांगीं पुराणांत राहतील पण इतिहास काय साक्ष देतो ?

"आद्य शंकराचार्य इतिहासांत येतात. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, समर्थ रामदास, तुकोबा इतिहासांत येतात. ही अध्यात्मिक परंपरा टिकाऊ आहे, अद्यावत चालू आहे. हुमणाबादचे माणिकप्रभू, अक्कलकोटचे स्वामीमहाराज, बंगालचे रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, अरुणाचलचे रमणमहर्षि, गरुडेश्वराचे वासुदेवानंद सरस्वत, शिरडीचे साईबाबा, माणदेशचे श्री गोंदिवलेकर महाराज इ. साधुसंतांनीं "स्वातंत्र्य दीप" चक्षुर्वैसत्यं करून भरत खंडांत कायमचा उजळत ठेवला आहे. या ऋषीमुनींनीं साधुसंतांनीं केलेले अलौकिक चमत्कार मानवाच्या अध्यात्मिक जीवनाचा प्रत्यक्ष पुरावा आहे. त्यांनीं लिहिलेले ग्रंथ म्हणजे केवळ काव्य कादंबरी नव्हेत. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, दासबोध, तुकोबांची गाथा इत्यादि प्राकृत ग्रंथांनीं आपल्या जिण्याला दिव्यता प्राप्त करून दिलेली आहे. त्यांत त्यांचा स्वानुभव शब्दाक्षरागणिक भरलेला आहे. त्यांचे ग्रंथ व बोल म्हणजे पुराणांतील वांगीं खास नव्हत. अनुभव घेऊनच लिहिले आहे सारं त्यांनीं. काव्य व सत्य यांचा सुंदर संगम आहे तिथें एकनाथ महाराजाचं "भरत-

खंडी जन्मस्थिति । ही परम भाग्याची संपत्ति ॥ " या ओवीचं प्रत्येक भारतीयानेंच काय पण अभारतीयानेंहा चिंतन करावं. म्हणजे कोणत्याही भौतिक ज्ञानाला वा विज्ञानाला मूलाधार अध्यात्म आहे हें ठसेल, स्वातंत्र्याचं अधिष्ठान सूक्ष्मांत आहे हें कळेल.

"देशाकरतां जीव देण्याची ज्यांची तयारी त्यांना अध्यात्म साधण्याकरतां जीव देण्यास काय कठीण ? देशकार्य किंवा देवकार्य प्रेमानेंच होणार. प्रेमांत त्याग सहजच आहे. स्वदेशासारख्या विशाल संस्थेकरतां जीव देणारे राष्ट्रपुरुष व देवासारख्या विराट संस्थेकरतां जीव देणारे महापुरुष ( जीवदशा नष्ट करणारे ) ऋषी, मुनी, योगी, साधु-संत तुल्यबलच आहेत. बाह्य दृष्टी अंतर्मुख झाली कीं अध्यात्मिक स्वातंत्र्य आहेच मृत्युलोक म्हणजे एक "जन्मठेपच". इथेंच मानवाच्या वासना व वृत्ति साधनानें हळुहळुं निवळतात. मृत्युलोक हें शुद्धिगृह आहे. अयोग्य वासनांनीं चोर व वेडे झाले. त्याकरतां मृत्युलोक हा अनुक्रमें तुरुंग वेड्याचं इस्पीतळासारखा आहे. योग्य उपचार केले म्हणजे ( साधना केली म्हणजे ) शुद्धता येऊन "स्व"राज्य मिळतं." [ 'अस्सलाकडे' ले. खांदर. ]

सदर निवेदन 'खांदर' यांच्या "अस्सलाकडे" या पुस्तकांतील "महाराज" या प्रकरणांतील सदानंद महाराजांचें आहे. हे महाराज म्हणजे मुंबई पासून एका हांकेवर असलेल्या ठाणे गांवाच्या स्टेशनपलिकडे असलेल्या कोपरी खेड्यांतील ( हल्लीं कोपरी कॉलनी ) पुष्कळांस ठाऊक असलेले "कोपरीचे महाराज" यांच्या जिण्याबद्दल आहे. हे सदानंद महाराज लोकमान्य टिळकांच्या सुरवातीच्या काळीं Terrorist देशभक्त ( दहशतवादी ) वयाच्या विशीच्या सुमारास धारवाड कडे जंगल खात्यांत नोकरीस होते. त्यांच्यावर पकड-वॉरंट सुटल्यानें ते भुमिगत होऊन काशीयेथें एका अष्टांग-योगांत पूर्ण

'राम 'बाई ही होय. बालवैधव्यांतच वैराग्य प्राप्त होऊन रामोपासनेनें 'पतिव्रतेचा' अधिकार प्राप्त झालेली ही महाराष्ट्रीय बाई. स्त्री-देहांतही मानव ज्ञान, कर्म, भक्ति, योग, साधू शकतो ह्याचं लेखकाच्या प्रत्यक्ष आठवणीतलं रामबाई ह प्रत्यक्ष उदाहरण. या रामबाई, राममारुति महाराज, सदानंद महाराज, या "योग्यां" जवळ सिद्धी होत्या व त्यांचा अनुभव अनेकांस आलेला आहे. इंदूर महाराणी अहल्याबाईच्या अध्यात्मिक उंचीची स्मृति करून देणारी रामबाई!

नारेश्वर ( बडोदा, गुजराथ ) हें दत्त उपासनेंचें एक महान् नवकेंद्र गेल्या कित्येक वर्षें ( सुमारें ४० वर्षें ) रंग अवधूतस्वामी या महाराष्ट्रीय विभूतीनें निर्माण केलेलें आहे. हे परम-अवधूत संत हरद्वार येथें नुकतेच ब्रम्हपदीं विलीन झाले. भोगीना भोग त्यजावे। त्यागीना त्याग टकावे ॥ ( भोगाचा त्याग करवणारा व त्यागी लोकांचा त्याग टिकवणारा ) अशी श्रीदत्ताची योगशक्ति गुजराथसारख्या भोगभूमीत असलेल्या हजारों गुजराथी कुटुंबांत या परमत्यागी महाराष्ट्रीयानें प्रसृत केलेली आहे. बाल ब्रह्मचारी, बालयोगी, बाल स्वदेशभक्त असा हा परम अवधूत मुंबई युनिव्हर्सिटीचा संस्कृत स्कॉलर असून महात्माजींच्या साधक–आश्रमांत प्रथम सुमारें १९२०–२१ साली साबरमतीस होता. परंतु वासुदेवानंद सरस्वतीच्या ( टेंबें स्वामींच्या ) स्वप्न आदेशावरून नर्मदा प्रदक्षिणा केवळ गुळपाण्यावर करून प्रखर वैराग्य व योग सामर्थ्य मिळवलें. जन्मभर जिर्ण धारेवर, बद्रिकेदारीं रंग अवधूतांना भयंकर बर्फमय गारठ्यांत केवळ दोन लंगोट्यांवर ( एक नेसती व एक वाळते आहे ) पाहिलेले लोक हयात आहेत ( ज्या लोकानीं बद्रिकेदारीं त्या वेळेला पांच-पांच आंगांतलीं घातलेली तरी थंडी वाजते) यांच्या निर्याणानंतर बहुतेक मराठी पेपर्समधें त्यांचा फोटो व स्फुट माहिती आलेली होती. यांच्या गुजराथी

भाषेंतील ' दत्त बावनीं ' या ५२ दत्ताचे श्लोक वाचून कित्येकांस साक्षात्कार झालेला आहे. गुजरातमधें " दत्त बावनी " Atom Bomb ( शक्ति स्फोटक ) म्हणून केवळ कौतुकानें नव्हे तर अनुभवानें लोकांनीं वाखाणली आहे.

यांची अनुग्रहीत मंडळी गुजराथ, महाराष्ट्र व इतर भारतांत हजारों आहेत.

" परमात्मा, सर्वज्ञ, सर्वांचा अधिष्ठाता सत्यरूप आणि या विश्वांतील देखाव्याचें मूळ कारण असूनही स्वतःस जाणूं शकत नाहीं. त्याला स्वतःला जाणावयाचें असेल तर तें प्रतिबिंबरूपानें मात्र जाणतां येईल. हें सर्व विश्व त्या अनंत सर्वज्ञाच्या आरशासारखें आहे. सर्वांत श्रेष्ठ आरसा म्हणजे पूर्णत्व पावलेला मनुष्य; त्यांत त्या अनंत सर्वज्ञाचें यथास्थित प्रतिबिंब उतरलेलें असतें. " विवेकानंद. मराठींत ( वाङ्मय-जिण्यांत ) वेदांचं वर विवेकानंदांनीं सांगितल्लेलं वर्म आणलं ते आरसे म्हणजेच संत-सत्गुरु. त्यापैकीं निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम ॥ ' या भजनांत मराठींतलि महान् संतसद्गुरूंपैकीं कांहीं नांवाचा निर्देश आहे. महाराष्ट्रांतील वज्रेश्वरी–गणेशपुरी ( मुंबई ) येथील नुकतेच निर्वाण पावलेले भगवान् नित्या-नंद या ( संत, सत्गुरु ) महायोगेश्वरांचं ' पौरुष ' वर्णन त्यांचेच एक प्रमुख भक्तवर स्वामी मुक्तानंद ( गांवदेवी–गणेशपुरी ) परमहंस यांच्या शब्दांतः—

" श्रीगुरुदेव के दरबारमें हिंदु–मुसलमान, क्रिस्ती शीख, पारसी, इसाई, यहुदी, जैन आदि सब धर्मों के लोग आया करते थे और उनको ईश्वर निरीश्वरवादी सब पूजते थे. सब प्रकार के उपासनामें उनकी समबुद्धि थी. वे सगुण निर्गुणमें भेद नहीं मानते थे. वो लोगोमें

बडे-बडे नेता, अधिकारी, डॉक्टर, वकील, शास्त्री, फकीर, संन्यासी, योगी, साधक, कवि, संगीत-कार, संशोधक, श्रीमंत, भिकारी, रोगी, मजदूर, नट-नटी, साधु-साध्वी, मूर्ख, चोर, शिकारी—जगतमें, जितने प्रकार के लोक रहते है वे सब वहां आते थे ! एक पंडित मेरेकू बोल रहे "स्वामी, आपके गुरुदेव का दरबार भगवान का ही दरबार है," क्यौं की सब प्रकार के जीवात्मा केवल वहीं साथ रह सकते हैं जहां भगवान का स्थान हो। जीवन के बीना क्या जीव रह सकता है? उसी प्रकार भगवत्पुरुष की सबको जरूरत है. उनके पास पंडित को भी शांति मिलती है और मूढ को भीं। भगवान् नित्यानंद पूर्ण योगीश्वर और परम अवधूत थे। वे निजानंदमें मस्त रहा करते थे। वह हरएक काल और अवस्थामें एकसी परमानंद स्थितीमें दिखाई पडते थे। इनको निद्रावश किस नें नहीं देखा। कुच संतजनों के सत्संगमें मैनें सुना है की महापुरुषोंको निद्रा नहीं आती। उनके महानिर्वाण यात्रा समय लगभग तीन चार लाख लोगों के एकत्रित समूह की आंखे अपने गुरुदेव को अंतिम बिदाई देते हुए अश्रु-विव्हल हो गयी।" दोन दिवस अगोंदर मुक्तानंदांनीं पण विरह व्याकुलतेनें भगवानांच्या विशाल हृदयावर आपलं मस्तक टेकून 'मेरे गुरुदेव' म्हणून अश्रूंचा अभिषेक केला होता जणूं ! वज्रेश्वरी-गणेशपुरी-गांवदेवी ( महाराष्ट्र-मुंबई ) येथील भगवान् नित्यानंद व विद्यमान् स्वामी मुक्तानंद, परमहंस या योगेश्वरांची यथामति सेवा करून त्यांची खालील माहिती जनसेवेस सादर करीत आहे.

भगवान् नित्यानंद म्हणजे "अस्सल" साकारलेलें एक-तत्व कोमल, करुणामय, स्वानंदघन, विदेही, बहुधः मौनी असं त्यांचं गणेशपुरी येथील अलौकिक जिणं. चोरपोर, थोर, हिंदू, पार्शी, मुसलमान, क्रिश्चन, परदेशी ( Foreigners ) इत्यादि सर्वधर्मीय

यांच्याकडे समदृष्टीनें, मानवतेनें व केवळ निरपेक्षतेनें वघणारा त्यांची "अलौकिक" सेवा करणारा, त्यांच्या नवसास पावणारा गोरगरीब व त्यांच्या मुलांबाळांस स्वखर्चानें रोज सहस्र-भोजन घालणारा, उष्णकुंड, विहिरींचा जिर्णोद्धार करणारा, शाळागृह, पोष्ट ऑफिस बांधणारा "अस्सल" अवधूत; अखिल भारतांतील संत, साधू, योगी इत्यादि मानवकुलदीपक महात्म्यांनीं, लोकसेवकांनीं मुंबईतील लोकांनीं, लक्षाधीशांनी, व्यापाऱ्यांनीं हायकोर्ट जज्ज, मॅजिस्ट्रेट, ॲडव्होकेट वगैरे विद्वान् मंडळींनीं सुद्धां वारंवार दर्शन घेतलेला हा महायोगेश्वर ८-८-१९६१ रोजीं महानिर्वाण पावला.

योग्यांचे, साधु-संतांचे, सद्गुरूंचे चमत्कार भारताला कांहीं नवीन नाहींत. यांचे चमत्कार "चक्षुर्वैसत्यं" करुन पाहिलेले पुष्कळ जण भारतीय ( अभारतीयांतसुद्धां ) स्त्रीपुरुषांत आहेत. एका विदेशी बाईनें केवळ दृढदृष्टिपातानें घड्याळाचे कांटे मागे पुढें केले तर चमत्कार वाटला नव वैज्ञानिकांना. आपल्याकडे असले चमत्कार म्हणजे साधकांचे ( सिद्धांचे तर राहूंद्यात्त ) पोरखेळ आहेत. उघड्या डोळ्यांनी घड्याळाचे कांट्यावर 'दृष्टी'-संयम करून कांटे हालवणं नवसाधकास सुद्धां कांहीं कठीण नाहीं. एक पाऊल पुढें जाऊन उद्यां तीच बाई डोळेमिटून सुद्धा तो चमत्कार करूं शकेल. पातंजल योग दर्शनांतील अष्टांग योग आचरणारे हटयोगी प्रत्येक आसना गणिक (८४ आसनं आहेत.) एक एक सिद्धि (Supernatural Power) त्वरीत मिळवतात, हे भारतास नव्यानें सांगावयास नको. याहीपेक्षां सहज विश्वास न बसणारे विविध चमत्कार भगवान् नित्यानंदांच्या योगमय जिण्यांत घडलेले आहेत ( Master-key To Peace हें D. R. K. यांचे इंग्रजी पुस्तक पहावें. )

भगवान् नित्यानंदांचा महान् चमत्कार म्हणजे त्यांनीं कित्येक स्त्रीपुरुषांस (शक्तिपातानें वा कृपादृष्टीनें म्हणा) वैराग्य व ज्ञान प्राप्त करून दिलेलें आहे. M. A. झालेली (वय ६० च्यापुढें) एका उच्च शिक्षित कुटुंबांतील कुटुंबवत्सल बाईला (हिचे मुलगे कुणी कोर्ट न्यायाधीश, कुणी व्यापारी इ.) नित्यानंदकृपेनें जें प्रखर वैराग्य १५-२० वर्षापूर्वी आलं तेव्हां ती भरला संसार त्याग करून आनंदानें बाहेर गांवी "मठ" चालवीत आहे. असें शक्तिपातानें वैराग्य व ज्ञान झालेले अनुगृहीत स्त्रीपुरुष लोकसेवा करीत आहेत. कधीं स्पर्शमात्रें, कधीं दृष्टीक्षेपानें, कधीं शब्दानें, कधीं मौनानें, कधीं स्वप्नांत असा हा शक्तिपाताचा अनुभव नित्यानंद दर्शनास गेलेल्यांना आलेला आहे. शक्तिपात तंत्राचं ज्ञान भारतीय योग्यांत पूर्वापार आहे. "सहज"-साधनांचा सहज-उपाय असा हा "शक्तिपात" वा "कृपादृष्टी."

भगवान् नित्यानंदांचे वर सांगितलेले एक भक्तवर स्वामी मुक्तानंद परमहंस (परमहंस ही पदवी त्यांस स्वतः भगवान् नित्यानंदांनी दिली) हे सुद्धां पट्टीचे योगी व शक्तिपात-विज्ञानाचे पूर्ण तंत्र जाणणारे आहेत. त्यांचा आश्रम (श्री गुरुदेवाश्रम) गणेशपुरीजवळील गांवदेवी येथें आहे. आतांपर्यंत हजारों लोकांना त्यांच्या शक्तिपात-सामर्थ्याचा अनुभव आल्ला आहे. भगवान् नित्यानंदांचें इमान, सेवा व मानवतेचं कार्य स्वामी मुक्तानंदांचा गांवदेवी (गणेशपुरी) येथील गुरुदेवाश्रम फार निकरानें चालवीत आहे. तेथें त्यांनीं जी अद्यावत् "दुसरी" गणेशपुरी निर्माण केली आहे त्यावरून भगवान नित्यानंदांचा संचार गुरुदेवाश्रमांत अखंड आहे असं वाटल्याशिवाय राहात नाहीं. नित्यानंदांपासून वैराग्य व ज्ञान मिळवलेले कित्येक जण स्वामी मुक्तानंदांची सेवा तत्परतेनें करीत आहेत. महाराष्ट्रांत शक्तिपातकुशल योग्यां पैकी दोन विनम्र योगी, एक पुण्याचे पूर्ण संत गुळवणी महाराज [ व दुसरे

श्री गुरुदेवाश्रमाचे वरील स्वामी मुक्तानंद हें लेखकास ठाऊक आहेत. भारतीय योग-शास्त्रांतील सत्यं आत्मसात् करून सिद्धत्व पावलेले शक्तिपातकुशल असे हे दोन विद्यमान पुरुष असून त्यांच्या शक्तिपात विज्ञान शक्तीचा आज हजारों साधकांना रोकडा अनुभव येत आहे. भारतीय योगमार्गांतील नाम, संत, व सद्गुरु हीं ( यांतील सद्गुरु-कृपा वा शक्तिपात ही ) सहज व सोपी साधनं "स्व"-राज्य सिद्ध होण्याकरतां आहेत. सत्य-संशोधन करणाऱ्या कोणाही सामान्य माणसाला हा शक्तिपात मार्ग पूर्वापार खुला आहे. भगवान् नित्यानंद कालापासून तो अद्यावत मुक्तानंद-आश्रमांत ( गुरुदेवाश्रमांत ) भारतीयच काय पण कित्येक अभारतीयही ( Foreigners ) शक्तिपाताचा रोकडा अनुभव घेत आहेत. हें केवळ भारतीय सत्य-संशोधनाचंच नव्हे तर सत्य सिद्धतेचं पण द्योतक आहे यांत काय नवल ! स्वामी मुक्तानंद गुरुदेवाश्रमाचें ब्रीद वाक्य "परस्पर-देवो भव" (एकमेकांची सेवा करा) हें आहे. लाखों प्रपंची कुटुंबांना योग्य मार्गदर्शन करणारा हा आश्रम आहे.

संतवृत्ति निवृत्तिप्रधान जरी असली तरीं " अस्सल " "सहज" स्वातंत्र्याच्या आड येऊं पाहणाऱ्या प्रत्येक गनिमाशीं झुंज देण्याकरतां लागणाऱ्या पौरुषाची स्फूर्ति पण त्यांच्याजवळ आहे. म्हणूनच पाकिस्तानशीं भारताच्या झालेल्या मुकाबल्याच्या सुरवातीस स्वामी मुक्तानदांनी १००० रु. पोंच सरकारकडे युद्ध फंड म्हणून केली होती.

ॐ तत्सत्०

ठाणे.

[उलटून पहा

( मराठी )

## — अस्सलाकडे —

विसावं शतक, विसावं साल, विशीचं वय, ( Teenagers )
मुलांचें व त्यांच्या नकलाकार संवगड्यांच्या त्यागी वाङ्मय
जिण्याचं दर्शन वरील पुस्तकांत वाचा.

पृष्ठें २०६
किंमत ५ रुपये
ले.-खां. द. र.

विक्रेते :
दादर बुक डेपो,
रानडे रोड, दादर
मुंबई–२८.

( इंग्रजी )

# Master-Key To Peace

**( Bhagwan Nityanand of Ganeshpuri Vajreshwari )**

*by*

**D. R. K.** B. A; LL. B.

*Price Rs.* **2/-**

*Sellers :* **Dadar Book Depot,**
Ranade Road,
Dadar, Bombay-28.

REFBK-0018186
REFBK-0018186